गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील क्रिटीकल/स्ट्रॅटेजिक खनिजे तसेच तांबे, सोने, PGE आणि REE यासारखे खोलवर दडून असलेली खनिजे यांचा भूगर्भीय शोध घेण्यासाठीच्या प्रकल्पासाठी मे. जेमको काटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.एमएनजी- ११२५/प्र.क्र.५७/उद्योग-९ब
उद्योग ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ डिसेंबर, २०२५.

वाचा :- १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.एमएनजी-०८१६/प्र.क्र.७१/उद्योग-९, दि.२०.०९.२०१६

२. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.Tech/S.G/१९५९/२०२५/३९६६, दि.०१.१२.२०२५

<u>प्रस्तावना</u> -

संदर्भ क्र. १ येथील दि.२०.९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये, खनिजांच्या पूर्वेक्षणाकरिता व अवैध खाणकाम नियंत्रणासाठी प्रत्येक वर्षी खनिज महसूलाद्वारे स्वामित्त्वधनाच्या १.०% रक्कम या प्रयोजनासाठी अर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे उपलब्ध करुन देण्याची तरतूद नमूद आहे. त्यानुषंगाने जून, २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनात वित्तीय वर्ष २०२५-२६ चे खनिज विकास (अनिवार्य खर्च) अंतर्गत रु.१० कोटी एवढ्या खर्चाची पुरवणी मागणी खनिकर्म विभागास मंजूर करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये महासंचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील क्रिटीकल/स्ट्रॅटेजिक खनिजे तसेच तांबे, सोने, PGE आणि REE यासारखे खोलवर दडून असलेली खनिजे यांचा भूगर्भीय शोध घेण्यासाठीच्या प्रकल्पासाठी मे. जेमको काटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक करण्यास व त्यायोगे येणाऱ्या रु. ७,००,००,००० (सात कोटी) एवढ्या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी मे. जिओमरीन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (M/s Geomarine Solutions Pvt. Ltd.) व मे. जेमको काटी एक्सप्लोरेशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s Gemko Kati Exploration Pvt.Ltd.) या दोन संस्थेंची एम्पॅनल्ड संस्था म्हणून निवड केलेली आहे.

यापैकी मे. जेमको काटी एक्सप्लोरेशन प्रायव्हेट लिमिटेड (M/s Gemko Kati Exploration Pvt.Ltd.) या अधिसूचित खाजगी अन्वेषण संस्थेने (NPEA) गडचिरोली जिल्ह्यातील सहा लोहखनिज ब्लॉकमध्ये Reconnaissance सर्वेक्षण पूर्ण केले आहे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील चुनखडीसाठी दोन प्राथमिक अन्वेषण प्रकल्प देखील पूर्ण केले आहेत. सबब, महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय,नागपूर यांनी शिफ़ारस केल्या नुसार "मे. जेमको काटी एक्सप्लोरेशन प्रायव्हेट लिमिटेड" या संस्थेची गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील क्रिटीकल/स्ट्रॅटेजिक खनिजे तसेच तांबे, सोने, PGE आणि REE यासारखे खोलवर दडून असलेली खनिजे यांचा भूगर्भीय शोध घेण्यासाठीच्या प्रकल्पासाठी निवड करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

शासन निर्णय -

संदर्भाधीन पत्रातील प्रस्तावाद्वारे कळविण्यात आल्यानुसार, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील क्रिटीकल/स्ट्रॅटेजिक खनिजे तसेच तांबे, सोने, PGE आणि REE यासारखे खोलवर दडून असलेली खनिजे यांचा भूगर्भीय शोध घेण्यासाठीच्या प्रकल्पासाठी मे. जेमको काटी प्रा.लि. या संस्थेची नेमणूक करण्यास व त्यायोगे येणाऱ्या रु. ७,००,००,००० (सात कोटी) एवढ्या प्रशासकीय खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ब्लॉकनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ब्लॉकचे नाव | खनिज | क्षेत्रफळ(चौ.कि.मी.)/अन्वेषणाचा टप्पा | जिल्हा | खर्च (GST सह) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोरवाही (जरावंडी १) | REE&RM | ६४.५ चौ.किमी/जी-४ | गडचिरोली | रु.७३.१४ लाख |
| २ | चेन्नाबोडी (जरावंडी २) | REE&RM | ६४.५ चौ.किमी/जी-४ | गडचिरोली | रु.७३.१४ लाख |
| ३ | वड्डम ब्लॉक | REE&RM | ७५ चौ.किमी/जी-४ | गडचिरोली | रु.७३.१४ लाख |
| ४ | सुंदरनगर ब्लॉक | Base Metal & Gold | १२० चौ.किमी/जी-४ | गडचिरोली | रु.८८.११ लाख |
| ५ | दरेकसा कोपलगड ब्लॉक | PGE | ८४ चौ.किमी/जी-४ | गोंदिया | रु.१३६.९८ लाख |
| ६. | इर्पनार ब्लॉक | REE&RM | ५० चौ.किमी/जी-४ | गडचिरोली | रु.७३.१४ लाख |
| ७ | चिचोली ब्लॉक | REE&RM | ५५ चौ.किमी/जी-४ | भंडारा | रु.७३.१४ लाख |
| ८ | साकोली ब्लॉक | Copper | ५० चौ.किमी/जी-४ | भंडारा | रु.७३.१४ लाख |
| **एकूण अंदाजे किंमत (GST सह)** | | | | | रु.७००.०० लाख |

२. सदर खर्च करताना व यासाठी खाजगी संस्थांना कामे देणे, खरेदी प्रक्रीया राबविणे यासारख्या कार्यवाही करताना शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या संबंधित धोरणे, शासन निर्णय व सुचनांचे तसेच आर्थिक निकष व मर्यादांचे काटेकोरपणे पालन व्हावे. तसेच, संस्थेद्वारे प्राप्त अहवालातून निघणाऱ्या निष्कर्षाचा गोषवारा यथावकाश शासनास सादर करावा.

३. याअन्वये होणारा खर्च "मागणी क्र.के-७, २८५३, अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग, १०२(००)(०५)खनिज विकास (अनिवार्य), ३१,सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२८५३०१३२)" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झालेल्या रु. १० कोटी एवढ्या पूरक मागणीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-३

Scanned with CamScanner

मधील अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७(२) व शासन निर्णय क्र. विअप्र २०१५/प्र.क्र.२०/२०१५/विनियम, दि.१९.०१.२०१५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. यानुषंगाने निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(लक्ष्मीकांत ढोके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
२. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर. (संचालनालयामार्फत)
४. कक्ष अधिकारी, प्रशा-१, उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. निवडनस्ती (उद्योग-९ब)

Scanned with CamScanner